# १९.
# राज्य योजना / केंद्र पुरस्कृत / जिल्हा नियोजन समिती योजना

# १९. राज्य योजना / केंद्रपुरस्कृत / जिल्हा नियोजन समिती योजना

## १. राज्य योजना

## अनुक्रमणिका

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १ | आयुक्त पशुसंवर्धन/प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालयाचे बळकटीकरण. |
| २ | राज्यातील जनावरांना आवश्यक असणाऱ्या क्षार मिश्रणे व सूक्ष्मद्रव्ये यांचा अभ्यास करणे. |
| ३ | महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाची स्थापना/ बळकटीकरण. |
| ४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळास भागभांडवल. |
| ५ | गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोरेगांव मुंबईचे आधुनिकीकरण. |
| ६ | लोकर व खाद्य विश्लेषण प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण. |
| ७ | राष्ट्रीय सहकार विकास निगम (भाग भंडवल) व राष्ट्रीय सहकार विकास निगम (कर्जे) |
| ८ | पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - १ ची स्थापना करणे (वेतन). |
| ९ | पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - २ चा दर्जावाढ करणे (वेतन). |
| १० | पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची स्थापना, आधुनिकीकरण, बळकटीकरण करणे (वेतन). |
| ११ | स्वेच्छा निधी अनुदान. |
| १२ | जिएलपी/जिएमपी मानकानुसार पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंधचे बळकटीकरण करणे. |
| १३ | राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगरचे बळकटीकरण करणे. |

### २. नाविन्यपूर्ण योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १ | दुधाळ जनावरांचे गट वाटप. |
| २ | अंशतः ठाणबद्ध पद्धतीने शेळी पालनाव्दारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे. |
| ३ | राज्यात कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षीपालन व्यवसाय सुरू करणे. |

### ३. केंद्र पुरस्कृत योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १ | लाळ खुरकूत रोगमुक्त पट्टा निर्माण करणे. |
| २ | ॲस्कॅड योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे रोगावर नियंत्रण. |
| ३ | ॲस्कॅड योजनेअंतर्गत प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन करणे. १०० टक्के केंद्र पुरस्कृत. |
| ४ | ॲस्कॅड योजनेअंतर्गत विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण. |
| ५ | ॲस्कॅड योजनेअंतर्गत जिल्हास्तर व तालुकास्तरावर माहिती व जनसंपर्क मेळावे आयोजित करणे. |
| ६ | ॲस्कॅड योजनेअंतर्गत पशुरोगांचे सर्वेक्षण, संनियंत्रण व पूर्वअंदाज बांधणे. |

| | |
|---|---|
| ७ | ॲस्कॅड योजनेअंतर्गत बर्ड फ्ल्यू रोगाचे नियंत्रण. |
| ८ | राष्ट्रीय बुळकांडी रोग निर्मूलन कार्यक्रम. |
| ९ | ॲडमास योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत. |
| १० | पश्चिम विभागीय रोग अन्वेषण संदर्भ प्रयोगशाळा. |
| ११ | गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोरेगांव मुंबईचे आधुनिकीकरण - (१०० टक्के अपेडा योजना). |
| १२ | रवंथ करणारे लघु प्राणी आणि ससे यांचा एकात्मिक विकास कार्यक्रम - (१०० टक्के केंद्र पुरस्कृत). |
| १३ | गवती कुरणांचा विकास योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत. |
| १४ | वैरणीच्या प्रमाणित बियाणाचे वाटप करणे. |
| १५ | वैरणीच्या विटा (फॉडर ब्लॉक मेंकिंग यूनिट) तयार करण्याचे यूनिट स्थापन करणे. |
| १६ | पशुगणना - १०० टक्के केंद्र पुरस्कृत. |
| १७ | एकात्मिक पाहणी योजना. |
| १८ | पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम व बळकटीकरण करणे - (केंद्र पुरस्कृत). |
| १९ | पीपीआर रोगाचे नियंत्रण करणेसाठीचा राष्ट्रीय कार्यक्रम - (१०० टक्के केंद्र पुरस्कृत). |
| २० | पोल्ट्री इस्टेट स्थापना - (केंद्र पुरस्कृत). |

## ४. अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना)

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १ | अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा |
| २ | अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांच्या दुधाळ जनावरांना खाद्य अनुदान |
| ३ | अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे |
| ४ | अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना शेळी गटाचा पुरवठा |
| ५ | अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांच्या जनावरांना जंतनाशक औषधांचा पुरवठा करणे |

## ५. बिगर आदिवासी सर्वसाधारण योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १ | पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकीकरण. |
| २ | विविध पशुवैद्यकीय संस्थांना औषधांचा पुरवठा करणे. |
| ३ | पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम. |
| ४ | एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम. |
| ५ | वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम. |
| ६ | कामधेनू दत्तक ग्राम योजना. |

## ६. आदिवासी उपयोजना /आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना

| अ.क्र. | योजनेचे नाव |
|---|---|
| १ | अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा. |
| २ | अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांच्या दुधाळ जनावरांना (भाकड काळासाठी) खाद्य अनुदान. |
| ३ | अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना शेळी गटाचा पुरवठा. |
| ४ | शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन. |
| ५ | अनुसूचित जमाती चे लाभार्थीना तलंगाचे गटाचा पुरवठा. |
| ६ | अनुसूचित जमाती चे लाभार्थीसाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम. |
| ७ | पशुवैद्यकीय दवाखान्यांचे बांधकाम करणे. |
| ८ | पशुवैद्यकीय संस्थांना औषधांचा पुरवठा करणे. |
| ९ | वंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करणे. |
| १० | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयाचे बळकटीकरण करणे. |
| ११ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाचे बळकटीकरण करणे. |
| १२ | तालुकास्तरावर लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाची स्थापना व बळकटीकरण करणे. |
| १३ | पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - १ ची स्थापना करणे. |
| १४ | पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - २ चा दर्जावाढ करणे. |
| १५ | जिल्हा कृत्रीम रेतन केंद्राची स्थापना व बळकटीकरण करणे. |

## १. राज्य योजना

| योजनेचे नाव | **(१) आयुक्त पशुसंवर्धन/प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालयाचे बळकटीकरण. (राज्य योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजने अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या स्वतःच्या मालकीच्या असलेल्या जागेमध्ये पुणे या ठिकाणी नवीन आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयासाठी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. याकरिता तसेच माहिती तंत्रज्ञानाचा यथोचित वापर करण्याअंतर्गत कार्यालयांमध्ये संगणक, ॲक्सेसेरीज, इंटरनेट इ. च्या सुविधा पुरविणे तसेच आवश्यक आज्ञावली (सॉफ्टवेअर) विकसीत करून माहितीच्या आदान-प्रदानामधील अचुकता, तत्परता व कार्यक्षमता वाढविणे या बाबींकरिता तसेच प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालयांमध्ये संगणक, ॲक्सेसेरीज, इंटरनेट इ. च्या सुविधा पुरविणे यासाठी खर्च करण्यात येतो. प्रादेशिक सहआयुक्त कार्यालयांच्या नवीन इमारतीचे बांधकाम देखील प्रस्तावित आहे. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(२) राज्यातील जनावरांना आवश्यक असणाऱ्या क्षार मिश्रणे व सूक्ष्मद्रव्ये यांचा अभ्यास करणे व मिनरल डिफिशिएन्सी पॅटर्न यांची प्रस्थापना.** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यातील विविध जिल्ह्यातील जनावरांच्या रक्तातील, त्यांना पुरविण्यात येणाऱ्या खाद्य व चाऱ्यातील तसेच शेत जमिनीतील सूक्ष्म अन्नद्रव्याची/क्षारांचे प्रमाण विश्लेषणाद्वारे शोधून प्रत्येक जिल्ह्यात कोणत्या सूक्ष्म अन्नद्रव्याची/ क्षारांची आवश्यकता आहे, याचा अभ्यास महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाअंतर्गत असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयामार्फत तसेच कृषि महाविद्यालयामार्फत करण्यात येत असून यासाठी शासनाने सन २००७-०८ या वर्षापासून योजनेची अंमलबजावणीस मान्यता दिलेली आहे. विद्यापीठाने प्राथमिक अहवाल दिलेला असून आगामी काळात सर्वच जिल्ह्यांचे तपशीलवार सर्वेक्षण करून घेऊन डिफिशिअन्सीचा पॅटर्न निश्चित करण्यात येईल. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(३) महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाची स्थापना/बळकटीकरण.** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | भारतीय पशुचिकित्सा परिषद, नवी दिल्ली यांच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाअंतर्गत अधिनस्त महाविद्यालयांमध्ये व विद्यापीठ मुख्यालयांच्या इमारतींचे बांधकाम व अन्य मूलभूत सुविधांचा विस्तार आणि मत्स्यविज्ञान महाविद्यालय, पेंचच्या आस्थापनेकरिता या योजनेअंतर्गत खर्च करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळास भागभांडवल-(राज्य योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या अधिनस्त विविध शेळी व मेंढी प्रक्षेत्राच्या बळकटीकरणासाठी व आधुनिकीकरणासाठी निधी खर्च करण्यात येतो. राज्य शासनाने महामंडळास भागभांडवल प्रदान करण्याची बांधिलकी स्वीकारली असून त्या अनुषंगाने या योजनेत खर्च करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(५) गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोरेगांव मुंबई चे आधुनिकीकरण - (राज्य योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोरेगांव मुंबई प्रयोगशाळे मार्फत राज्यातून जे मांस व मांसजन्य पदार्थ देशाबाहेर निर्यात केले जातात, त्यांची निर्यातपूर्व तपासणी केली जाते. या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्यातीसाठी जे निकष मंजूर आहेत त्याप्रमाणे मांस व मांसजन्य पदार्थांची तपासणी करण्याकरिता या प्रयोगशाळेत आधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यासाठी अपेडा या संस्थेकडून अनुदान प्राप्त झाले आहे. सदर अत्याधुनिक उपकरणांसह नवीन प्रयोशाळा इमारत बांधकाम व उभारणी करण्यासाठी प्रयोगशाळेच्या इमारतीचे जिएलपी मानकानुसार आधुनिकीकरण, विस्तारीकरण, फेरफार करणे यासाठी इमारतीच्या बांधकामासाठी या योजनेतून राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(६) लोकर व खाद्य विश्लेषण प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण. (राज्य योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा गोखलेनगर, पुणे-१६ येथे पशुखाद्य, कुक्कुट खाद्य इत्यादीमधील प्रथिने, स्निग्धता, आर्द्रता, तंतुमय पदार्थ, ॲश, सॅन्डसिलीका, कॅल्शिअम, फॉस्फरस व सॉल्ट या घटकांचे विश्लेषण केले जाते. या योजनेअंतर्गत प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी आधुनिक यंत्रसामुग्री/उपकरणे खरेदी करण्यात येतात. जेणेकरून वरील घटकांचे विश्लेषण जलद गतीने व जास्त अचूकपणे करणे निर्धारित आहे. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(७) राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत सहकारी कुक्कुटपालन संस्थांना सहाय्य (भाग भांडवल) राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत सहकारी कुक्कुटपालन संस्थांना सहाय्य (कर्जे)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यात कुक्कुट पक्षी पालन व्यवसायाचा सहकाराच्या माध्यमातून विकास व्हावा याकरिता राष्ट्रीय सहकार विकास निगम मार्फत अंड्यावरील कुक्कुट पक्षांचे संगोपन करणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य शासनाच्या माध्यमातून राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांचेमार्फत अर्थसहाय्य मंजूर केले जाते. राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली पुरस्कृत कुक्कुट पालन संस्थांना अर्थसहाय्य शासनामार्फत मिळाल्यानंतर दिलेल्या कर्जाची परतफेड १४ वर्षात विहित अटी व शर्तीनुसार सहकारी कुक्कुट पालन संस्थेने करणे आवश्यक आहे. सध्या कोणत्याही नवीन संस्थेच्या प्रकल्पास तसेच जुन्या/चालू प्रकल्पास अर्थसाह्य (वाढीव) न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. |
| योजनेचे लाभार्थी | नोंदणीकृत सहकारी कुक्कुटपालन संस्था (वैयक्तिक लाभाची योजना नाही). |
| लाभाचे स्वरूप | कर्ज व अनुदान. |

| योजनेचे नाव | **(८) पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी -१ ची स्थापना करणे (प.वि.अ. यांचे वेतन)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यातील पशुपालकाकडील मौल्यवान पशुधनाचे विविध आजारापासून तसेच सांसर्गिक रोगापासून संरक्षण करण्यासाठी त्यांना त्वरित पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने राज्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ ची स्थापना करण्यात येते. वास्तविक ही जिल्हास्तरीय योजना असून, यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हानियोजन समितीकडून दरवर्षी नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ स्थापन करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. त्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषदांकडून मध्यवर्ती सोईस्कर ठिकाणाची स्थाननिश्चिती करून, शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर नवीन पशुवैद्यकीय दवाखाना कार्यन्वित केला जातो. सदर योजनेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदासाठी आवश्यक आस्थापनेवरील सुरूवातीच्या पाच वर्षाचा खर्च, म्हणजेच याठिकाणी कार्यरत अधिकारी व पशुधन विकास अधिकारी यांचे वेतन या राज्य योजनेअंतर्गत अदा करण्यात यावेत असे शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार उक्त योजनेत तरतूद करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(९) पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ चा दर्जावाढ करणे (वेतन)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यात भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ हा ०१/०८/९७ पासून अंमलात असून या कायद्यातील तरतुदीप्रमाणे राज्यातील पशुधनास पदवीधर पशुवैद्यका मार्फत पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. त्यामुळे राज्यात सध्या कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चा टप्प्याटप्प्याने दर्जावाढ करणेसाठी राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समित्यांकडून दरवर्षी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जातो. दर्जावाढीनंतर सदर पशुवैद्यकीय दवाखान्यांचे ठिकाणी पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील पद निर्माण करून त्याठिकाणी पदवीधर पशुवैद्यकाची पद स्थापना करण्यात येते. सदर योजनेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदासाठी आवश्यक आस्थापनेवरील सुरूवातीच्या पाच वर्षाचा खर्च, म्हणजेच या ठिकाणी कार्यरत अधिकार व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते या राज्य योजनेअंतर्गत अदा करण्यात यावेत असे शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार उक्त योजनेत तरतूद करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |

| योजनेचे नाव | **(१०) पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाची स्थापना, आधुनिकीकरण, बळकटीकरण करणे (वेतन)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सध्या राज्यात ३२ जिल्ह्यात १७१ तालुकास्तरीय लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये कार्यरत आहेत. या पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयांमार्फत तज्ज्ञ, पदवीधर, पशुवैद्यक आधुनिक यंत्र सामुग्रीच्या सहाय्याने रोग निदानाच्या पशुवैद्यकीय सेवा पुरवितात. पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी आवश्यक पदांची निर्मिती करण्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालये कार्यान्वित करण्यात येतात. सदर योजनेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदासाठी आवश्यक आस्थापनेवरील सुरूवातीच्या पाच वर्षाचा खर्च, म्हणजेच या ठिकाणी कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते (प्रतिसंस्था ५ पदे) राज्य योजनेअंतर्गत अदा करण्यात यावे असे शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार उक्त योजनेत तरतूद करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(११) स्वेच्छा निधी अनुदान (राज्य योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजनेमधून पशुसंवर्धन विभागाच्या व जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या मालकीच्या इमारती, पशुवैद्यकीय संस्थाच्या आवश्यक किरकोळ दुरुस्त्या करणे इत्यादी कामे केली जातात. रुपये १०००००/- च्या मर्यादेत इमारतींची नागरी दुरुस्ती व विद्युतविषयक दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अंदाजपत्रके घेऊन करण्यात येते. रुपये १०००००/- च्या पुढील प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येऊन शासनाची मंजूरी घेऊन खर्च करण्यात येतो. सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करून सा. बां. विभागांमार्फत खर्च केला जातो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(१२) जीएलपी/जीएमपी मानकानुसार पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंधचे बळकटीकरण करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजने अंतर्गत जीएमपी मानकांनुसार पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेचे बळकटीकरण करणेसाठी या योजनेमधून खर्च करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे अंतर्गत लस निर्मिती प्रयोगशाळेच्या आधुनिकीकरणासाठी प्राप्त झालेल्या निधीमधून जिवाणू लस उत्पादना-साठी आवश्यक असणारी अत्याधुनिक यंत्रसामग्री (फरमेंटर टेक्नॉलॉजी) प्रस्थापित करून त्याद्वारे जिवाणू लसीचे उत्पादन करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून त्यायोगे जिवाणू लसीच्या लाखो मात्रा कमी कालावधीमध्ये उत्पादन करणे संस्थेस शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे विषाणूजन्य लसनिर्मिती प्रयोगशाळा पूर्णपणे नव्याने बांधण्यात येणार आहेत. याकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून मंजूर झालेल्या प्रकल्पाव्यतिरिक्त येणाऱ्या वाढीव खर्चासाठी उक्त योजनेतून तरतूद केली जाते. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(१३) राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगरचे बळकटीकरण करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगर ही राज्यातील सेवांतर्गत अधिकारी, कर्मचारी यांना पशु उजळणी प्रशिक्षण देणारी पशुसंवर्धन विभागातील एकमेव संस्था आहे. या संस्थेमार्फत पशुसंवर्धन विभागातील अधिकारी वर्ग, लिपिक वर्ग, पशुधन पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत या संस्थेचे बळकटीकरण करणे प्रस्तावित आहे. यामध्ये प्रशिक्षण केंद्राची इमारत, वसतिगृह, ग्रंथालय, उपहारगृह इ.च्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरणावर खर्च करण्यात येतो. राज्य शासनाच्या प्रशिक्षण विषयक धोरणानुसार या संस्थेच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

## २. राज्य योजना (नाविन्यपूर्ण योजना)

| **योजनेचे नाव** | **(१) दुधाळ जनावरांचे गट वाटप** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्याच्या दूध उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थार्जनाचे व स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी लाभार्थीना एकूण ६ संकरित गायी/६ दुधाळ म्हशींचे गट वाटप करण्यात येणार आहेत. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गट किंमतीच्या ५० टक्के अनुदान आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थींना अनुक्रमे १० टक्के व ५ टक्के एवढा निधी स्वतः उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४० टक्के व २० टक्के बँकेकडून कर्जरुपाने उपलब्ध करून घ्यावयाची आहे. दुधाळ जनावरांची खरेदी राज्याबाहेरील जनावरांच्या बाजारातून करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | सर्वसाधारण प्रवर्गातील (दारिद्रय रेषेखालील) तसेच अनुसूचित जातीचे/जमातीचे लाभार्थी. |
| लाभाचे स्वरूप | प्रतिदिन १० ते १२ लिटर दूध उत्पादन असलेल्या संकरित गायी/दुभत्या म्हशींचे गट (६ जनावरांचा गट) वाटप. |
| **योजनेचे नाव** | **(२) अंशतः ठाणबद्ध पद्धतीने शेळी पालनाव्दारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे** |
| योजनेचे स्वरूप | अंशतः ठाणबद्ध पद्धतीने शेळी पालनाव्दारे राज्याच्या मांस व मांसजन्य पदार्थांच्या उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थार्जनाचे व स्वयंरोजगाराचे पूरक साधन उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत १० शेळया व १ बोकड यांचे गट वाटप करण्यात येणार आहेत. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गट किंमतीच्या ५० टक्के अनुदान आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थींना अनुक्रमे १० टक्के व ५ टक्के एवढा निधी स्वतः उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४० टक्के व २० टक्के बँकेकडून कर्जरुपाने उपलब्ध करून घ्यावयाची आहे. या योतनेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यामध्ये उस्मानाबादी आणि संगमनेरी या जातीच्या तर कोंकण व विदर्भ विभागातील जिल्ह्यामध्ये स्थानीक हवामानामध्ये तग धरणाऱ्या शेळया व बोकड यांचे गटांचे वाटप करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | सर्वसाधारण प्रवर्गातील (दारिद्रय रेषेखालील) तसेच अनुसूचित जातीचे/जमातीचे लाभार्थी. |
| लाभाचे स्वरूप | उस्मानाबादी आणि संगमनेरी जातीच्या तसेच पैदासक्षम आणि उत्तम स्वास्थ असलेल्या १० शेळया व १ बोकड यांचे गट वाटप. |

| **योजनेचे नाव** | **(३) राज्यात कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षीपालन व्यवसाय सुरू करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यात कुक्कुट मांस उत्पादनास मोठा वाव आहे. ज्या जिल्ह्यामध्ये सध्या कुक्कुट पालन/कुक्कुट मांस उत्पादन करण्याचा व्यवसाय अद्यापही रुजलेला व वाढलेला नाही, तेथे कंत्राटी पध्दतीने सदरचा व्यवसाय करण्यासाठी लाभार्थ्यांना कुक्कुट पक्षी, खाद्य व पाण्याची भांडी या मूलभूत सुविधा उभारण्याकरीता ५० टक्के अनुदान देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याच प्रमाणे कंत्राटदार व्यावसायीक कंपनीला प्रत्येक युनिट मागे कंपनीच्या या अनुषंगाने आवश्यक पायाभुत सुविधांचा विकास करण्यासाठी रु. १.०० लक्ष यानुसार अनुदान देण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या उर्वरीत खर्चापैकी १० टक्के एवढा निधी लाभार्थीने स्वतः उभारावयाचा असून, उर्वरीत ४० टक्के निधी बँकेकडून कर्जाद्वारे मंजूर करून घ्यावयाचा आहे. तूर्त ही योजना नाशिक व कोल्हापूर जिल्ह्यात (सन २०११-१२ मध्ये) कंत्राटदाराच्या निश्चितीनुसार राबविण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | सर्वसाधारण प्रवर्गातील (दारिद्रय रेषेखालील) तसेच अनुसूचित जातीचे/जमातीचे लाभार्थी. |
| लाभाचे स्वरूप | कंत्राटदार कुक्कुट कंपनीच्या सहाय्याने प्रती लाभार्थी ४००० ब्रॉयलर पक्षी संगोपन करण्यासाठी अर्थसहाय्य. |

## ३. केंद्र पुरस्कृत योजना

| **योजनेचे नाव** | **(१) लाळ खुरकूत रोगमुक्त पट्टा निर्माण करणे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून, सन २००३-०४ पासून राज्यात ५ जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. राज्यातील पुणे, सातारा, अहमदनगर, औरंगाबाद, मुंबई या पाच जिल्ह्यामध्ये व ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी व वसई या तीन तालुक्यामधील संकरित गायवर्गीय व म्हैसवर्गीय जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, मांस व मांसजन्य पदार्थाच्या निर्यातीसाठीची कत्तलखाने मोठ्या प्रमाणात असल्याने या जिल्ह्यांची निवड सदर योजनेसाठी करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत गायवर्गीय व म्हैसवर्गीय जनावरांना लाळखुरकूत रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात येते. लाळखुरकूत रोग हा पायखुरी असलेल्या जनावरांमध्ये होत असून, सदर रोगामुळे जनावरांमधील दुग्धोत्पादन क्षमता कमी होते, शेतीच्या व वाहतुकीच्या कामासाठी उपयोगात येणाऱ्या जनावरांची क्रय शक्ती कमी होते. तसेच सदर रोगाच्या प्रादुर्भावामुळे मांस व मांसजन्य पदार्थाच्या निर्यातीवरही मोठा परिणाम होतो व पशुपालकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. सदर योजना संपूर्ण राज्यात राबविण्यासाठी केंद्र शासनाने सन २०११-१२ वर्षापासून मंजुरी दिली असून, त्यानुसार सन २०११-१२ पासून राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये गोवंशीय जनावरांमध्ये दर सहा महिन्यांनी सदर योजनेअंतर्गत लाळ खुरकूत रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात येत आहे. या अंतर्गत, लस मात्रांचा पुरवठा केंद्र शासनाकडून करण्यात येतो. राज्यातील एकूण २ कोटी जनावरांना (९० टक्के गोवंशीय) लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व पशुपालक (ज्यांचेकडे गोवंशीय/म्हैसवर्गीय पशुधन आहे). |
| लाभाचे स्वरूप | गाय वर्ग व महीष वर्गाच्या जनावरांना लसीकरण (फक्त रु. १/-नाममात्र सेवाशुल्क आकारून). |

| **योजनेचे नाव** | **(२) ॲस्कॅड योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे रोगावर नियंत्रण** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या तत्त्वावर राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत राज्यातील जनावरांमध्ये घटसर्प, फऱ्या, आंत्रविषार, पीपीआर व कुक्कुट पक्ष्यांमध्ये आरडी, लासोटा रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात येते. यासाठी जिल्ह्यातील रोग प्रादुर्भावास अनुकूल असलेल्या रोग प्रादुर्भाव झाल्याची पार्श्वभूमी असलेल्या भागातील जनावरांचे व कुक्कुट पक्षांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येते. ही योजना सर्व जिल्ह्यांत सन २००४-०५ पासून राबविण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व पशुपालक. |
| लाभाचे स्वरूप | गायवर्ग, महीषवर्ग, शेळ्या-मेंढ्यांना तसेच कुक्कुट पक्षांना लसीकरण. |

| **योजनेचे नाव** | **(३) ॲस्कॅड योजनेअंतर्गत प्रशिक्षण व चर्चासत्रांचे (सेमिनार)आयोजन करणे १०० टक्के केंद्र पुरस्कृत** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या योजनेअंतर्गत विविध सांसर्गिक रोगाचे निदान, त्यावर उपचार तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे याबाबतचे अद्ययावत ज्ञान मिळावे म्हणून राज्यातील पशुवैद्यकीय अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. यासाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अनुदान उपलब्ध होत असून रोग अन्वेषण विभाग, पुणे व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर यांचेमार्फत सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सदर योजनेअंतर्गत यशदा, पुणे, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था, पुणे तसेच वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन शिक्षण संस्था (वनामती), नागपूर या संस्थांव्दारे प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. |
| योजनेचे लाभार्थी | सेवांतर्गत अधिकारी व कर्मचारी (तांत्रिक कर्मचारीवृंद) |
| लाभाचे स्वरूप | प्रशिक्षण देणे. |

| योजनेचे नाव | (४) ॲस्कॅड योजनेअंतर्गत विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या तत्त्वावर राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत राज्यातील चिपळूण, नाशिक, पुणे, औरंगाबाद व अकोला या विभागीयस्तरावरील प्रयोगशाळांचे जीएलपी मानकाप्रमाणे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणेसाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री हत्यारे व अवजारे उपलब्ध करून घेणे व जीएलपी मानकानुसार बांधकाम करणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत. अशा प्रकारे सदर प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण झाल्यानंतर विभागाअंतर्गत विविध सांसर्गिक रोगांचे अचुक निदान करून पशुपालकांना त्वरित योग्य उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देणे शक्य झाले. ही योजना आता पूर्ण झाली आहे. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | (५) ॲस्कॅड योजनेअंतर्गत जिल्हास्तर व तालुकास्तरावर माहिती व जनसंपर्क मेळावे आयोजित करणे. |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या तत्त्वावर राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत दरवर्षी जिल्हास्तरावर प्रत्येकी २ व तालुकास्तरावर प्रत्येकी २ माहिती व जनसंपर्क मेळावे आयोजित करण्यात येतात. सदर योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर संपर्क मेळावे आयोजित करून पशुधनामध्ये होणाऱ्या विविध आजारांविषयीची, लसीकरणाबाबतची व विविध योजनांच्या अंमलबजावणी बाबतची माहिती शेतकऱ्यांना व जनतेला देण्यात येते व जनजागृती करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व प्रवर्गातील पशुपालक व शेतकरी |
| लाभाचे स्वरूप | माहितीचे प्रदान व प्रशिक्षणाव्दारे जनजागृती |

| योजनेचे नाव | (६) ॲस्कॅड योजनेअंतर्गत पशुरोगांचे सर्वेक्षण, संनियंत्रण व पूर्वअंदाज बांधणे. |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या तत्त्वावर राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत राज्यातील विविध पशुंच्या रोगांबाबत सर्वेक्षण केले जाते. ज्यामध्ये एकूण उद्‌भवलेले प्रादुर्भाव, हवामानाची स्थिती तसेच भौगोलीक परिस्थिती याबाबींचा सर्वंकष अभ्यास करून भविष्यात रोगांचे प्रादुर्भावाबाबत अंदाज बांधले जातात व त्या अनुषंगाने दर महिन्याला एक अशा एकूण १२ माहिती पुस्तिका (बुलेटिन्स) राज्यात प्रकाशित केल्या जातात. सदर अभ्यासामुळे रोगप्रादुर्भावाचे अंदाजाप्रमाणे आवश्यक प्रतिबंधक उपाययोजना करणे पशुवैद्यकांना तसेच पशुपालकांना शक्य होते व त्यांचे आर्थिक नुकसान कमी होण्यास मदत होते. ही योजना रोग अन्वेषण विभाग, पुणे यांचेद्वारे राबविली जाते. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | (७) ॲस्कॅड योजनेअंतर्गत बर्ड फ्ल्यू रोगाचे नियंत्रण. |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना ५० टक्के केंद्र हिस्सा व ५० टक्के राज्य हिस्सा या तत्त्वावर राबविण्यात येते. राज्यात नवापूर जिल्हा नंदूरबार तसेच जळगाव जिल्ह्यात सन २००५-०६ या वर्षी बर्ड फ्ल्यू या रोगाचा प्रादुर्भाव झाला. या रोगाचा संसर्ग वाढून त्याचा मानवास उपद्रव होऊ नये म्हणून सदर रोग आटोक्यात आणून नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र शासनाने मार्गदर्शक तत्त्वे ठरविली आहेत त्याप्रमाणे बाधीत क्षेत्रातील कुक्कुट पक्षी, त्यांची अंडी, विष्ठा, खाद्य व खाद्य घटक शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट करण्यासाठी झालेला खर्च भागविणेसाठी केंद्र शासनाकडून अनुदान दिले गेले.<br>तसेच सदर योजने अंतर्गत सन २०१०-११ या वर्षापासून बर्ड फ्ल्यू व इतर अचानक उद्‌भवणाऱ्या रोगांच्या सर्वेक्षणासाठी ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या तत्त्वावर निधी उपलब्ध करून दिला जातो. सदर योजना रोग अन्वेषण विभाग, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | -- |
| लाभाचे स्वरूप | -- |

| योजनेचे नाव | **(८) राष्ट्रीय बुळकांडी रोग निर्मूलन कार्यक्रम.** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना केंद्र शासनाच्या १०० टक्के अनुदानावर राबविण्यात येत असून, आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत देशातून बुळकांडी रोगाचे निर्मूलन करण्यासाठी गायवर्गीय, म्हैसवर्गीय जनावरांमध्ये १०० टक्के बुळकांडी रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. तसेच शेळ्या, मेंढ्यामध्येही या रोगाचे रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. त्यामुळे सन १९९९ पासून राज्यात या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही. मात्र रोगांचे सर्वेक्षण स्वतंत्रपणे करणे आवश्यक असून तसे केंद्र शासनाचे निर्देश आहेत.<br>सद्यस्थितीत या रोगाचे सर्वेक्षणाकरिता केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होत असून, त्यामध्ये पशुवैद्यकीय संस्थामधील पशुरुग्णांचे सर्वेक्षण, गावातील जनावरांचे सर्वेक्षण व राज्यातील पशु वाहतुकीच्या महत्त्वाच्या मार्गावरील गांवामधील जनावरांचे सर्वेक्षण करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(९) ॲडमास योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत.** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यात उद्‌भवणाऱ्या विविध सार्सर्गिक रोगांचे प्रादुर्भावाबाबत अंदाज बांधणेसाठी आय.सी.ए.आर. या संस्थेकडून दरवर्षी १०० टक्के अनुदानावर निधी उपलब्ध होत असून, सदर योजना रोग अन्वेषण विभाग, पुणे-७ यांचेमार्फत राबविण्यात येते. यामधून राज्यात उद्‌भवलेल्या विविध रोग प्रादुर्भावाचा अभ्यास केला जातो. सदर प्रादुर्भावाचे अनुषंगाने भौगोलिक परिस्थिती, हवामान, पर्जन्यमान या बाबींची पडताळणी करून सद्यःस्थितीत कोणत्या रोगाचे प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, याची पडताळणी केली जाते व त्यावरून रोग प्रादुर्भावाचे अंदाज संबंधित जिल्ह्यातील पशुवैद्यकांना कळविण्यात येतात. त्यामुळे रोग प्रादुर्भावाच्या अनुषंगाने प्रतिबंधक उपाययोजना करणे शक्य होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते. रोग अन्वेषण विभाग पुणे यांचेद्वारे या योजनेची अंमलबजावणी केली जाते. रोगनिदान किटस् खरेदीवर खर्च करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(१०) पश्चिम विभागीय रोग अन्वेषण संदर्भ प्रयोगशाळा** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | रोग अन्वेषण विभाग, पुणे-७ या संस्थेस पश्चिम विभागीय रोग अन्वेषण संदर्भ प्रयोगशाळा म्हणून केंद्र शासनाने मान्यता दिली असून, या संस्थेमार्फत महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गोवा या राज्यातील तसेच दीव व दमण या केंद्रशासीत प्रदेशात विविध रोग प्रादुर्भाव, त्यांचे निदान, उपचार, रोगनिदानासाठी आवश्यक त्या चाचण्या इत्यादी बाबींचे प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात येते. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. प्रतिवर्ष रुपये १.०० ते १.५० कोटी निधी केंद्र शासनाकडून मिळतो.<br>सदर योजनेअंतर्गत रोग अन्वेषण विभाग, पुणे-७ येथे पश्चिम विभागीय रोग अन्वेषण संदर्भ प्रयोगशाळा आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी तसेच प्रयोगशाळेच्या आधुनिकीकरण करण्याकरिता आवश्यक बांधकाम या बाबीवर खर्च करण्याचे लक्ष्यांकित आहे. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(११) गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोरेगांव मुंबईचे आधुनिकीकरण (अपेडा सहाय्यित योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोरेगाव मुंबई प्रयोगशाळेमार्फत राज्यातून जे मांस व मांसजन्य पदार्थ देशाबाहेर निर्यात केले जातात, त्यांची निर्यातपूर्व तपासणी केली जाते. या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्यातीसाठी जे निकष मंजूर आहेत त्याप्रमाणे मांस व मांसजन्य पदार्थांची तपासणी करण्याकरिता या प्रयोगशाळेत आधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यासाठी अपेडा या संस्थेकडून अनुदान प्राप्त होते. एकूण २६ आधुनिक उपकरणे अपेडाच्या निधीतून खरेदी करण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(१२) रवंथ करणारे लघु प्राणी आणि ससे यांचा एकात्मिक विकास कार्यक्रम (१०० टक्के केंद्र पुरस्कृत)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत रवंथ करणारे लघु प्राणी आणि ससे यांचा समग्र एकात्मिक विकास करणेसाठी केंद्र शासनाकडून तरतूद उपलब्ध होते. या अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या अधिनस्त विविध प्रक्षेत्रांचे बळकटीकरण करण्यात येते. तसेच सदर प्रक्षेत्रावर पैदासीसाठी उस्मानाबादी शेळ्या व माडग्याळ आणि डेक्कनी मेंढ्यांची खरेदी करून त्याचे संगोपन करण्यात येते. याद्वारे प्रजातीमध्ये अनुवंशिक सुधारणा करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच सदर प्रक्षेत्रावर सिंचन सुविधांचा विकास, वाडे बांधकाम व दुरुस्ती, कुरण विकास, संगणकीकरण, शेत जमिनीचा विकास करणे याबाबीसाठी खर्च करण्यात येतो. यापासून तयार होणारे जातीवंत मेंढे नर/बोकडाच्या पैदासीकरिता शेतकऱ्यांना रास्त किंमतीवर पुरवठा करण्यात येतो. अन्य अशासकीय संस्थांच्या शेळीपालन प्रक्षेत्रांनाही (जसे निबंकर ॲग्री रिसर्च इन्स्टिट्यूट, फलटण) केंद्र शासनाकडून या योजनेमध्ये पायाभूत सुविधांच्या बळकटी-करणासाठी तसेच संशोधन व विकास योजनांसाठी अर्थसहाय्य देण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(१३) गवती कुरणांचा विकास योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | गवती कुरणांचा विकास या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत जास्तीत जास्त १० हेक्टर क्षेत्रासाठी सुधारित गवताची लागवड करणेसाठी या योजनेमध्ये जमिनीचा प्रकार व लाभार्थीनुसार प्रती युनिट रुपये १.५० लक्ष ते रुपये १०.०० लक्ष पर्यंतचे अनुदान देण्यात येते. राज्यातील पशुधनाच्या आहाराची गरज भागविणेसाठी शासकीय, निमशासकीय, खाजगी, सेवाभावी (पांजरपोळ गोरक्षण) व इतर संस्था यांचेकडील पडीक क्षेत्रावर कृषि हवामान विभागानुसार सुधारित गवत/एकदल/द्विदल प्रजातीची लागवड करून हलक्या जमिनी, पडीक क्षेत्र, विकसीत करणे जमिनीची सुपिकता व उत्पादकता वाढविणे, त्यापासून उत्पादित होणारी वैरण पशुधनाच्या आहारासाठी तसेच टंचाई काळात चारा डेपो/वैरण संचयनी (फॉडर बँक) यासाठी उपयोगात आणणे व पशुधनाच्या आहारातील वैरणीची गरज काही प्रमाणात भागवून तूट कमी करणे, या योजनेची प्रमुख उद्दिष्टे व वैशिष्ट्ये आहेत. |
| योजनेचे लाभार्थी | शासकीय/निमशासकीय संस्था/गोशाळा/पांजपोळ/खाजगी संस्था/सेवाभावी संस्था |
| लाभाचे स्वरूप | गवती कुरणांच्या विकासाकरिता जमिनीच्या प्रकारानुसार आवश्यकतेप्रमाणे ५ ते १० हेक्टर क्षेत्रासाठी रुपये १.५० लक्ष ते रुपये १०.०० लक्ष पर्यंतचे अनुदान. |

| | |
|---|---|
| **योजनेचे नाव** | **(१४) वैरणीच्या प्रमाणीत बियाणांचे वाटप करणे.** |
| योजनेचे स्वरूप | वैरणीच्या प्रमाणीत बियाणांचे वाटप करणे ही योजना २५ टक्के राज्य हिस्सा व ७५ टक्के केंद्र हिस्सा या प्रमाणामध्ये राबविण्यात येते. योजनेअंतर्गत सुधारित वैरण प्रजातींचे कृषि विद्यापीठामार्फत प्रमाणीत बियाणे उत्पादन करून शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर वैरण उत्पादनासाठी वाटप करणे हे या योजनेचे उद्दिष्टआहे. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व प्रवर्गातील पशुपालक व शेतकरी |
| लाभाचे स्वरूप | १०० टक्के अनुदानावर वैरण उत्पादनासाठी बियाणे वाटप करणे |

| | |
|---|---|
| **योजनेचे नाव** | **(१५) वैरणीच्या विटा (फॉडर ब्लॉक मेंकिंग यूनिट) तयार करण्याचे यूनिट स्थापन करणे** |
| योजनेचे स्वरूप | सदर योजना ५० टक्के केंद्र हिस्सा व ५० टक्के लाभार्थी संस्थेचा हिस्सा या प्रमाणामध्ये राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत पशुधन उत्पादन व संगोपन यासाठी सकस पशुखाद्य उपलब्ध व्हावे म्हणून वैरणीच्या विटा तयार करण्याचे यूनिट स्थापन करणे यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. सदर योजनेअंतर्गत खाजगी/ सार्वजनिक संघटन/उद्योग यांना ५० टक्के अनुदान देण्यात येते. (रुपये ४२.५० लाख मर्यादेत)<br>१. पिकांचे अवशेष (क्रॉप रेसिड्यू) वाया न घालविता वैरणमिश्रीत खाद्य तयार करण्याकरिता उपयोगात आणणे.<br>२. पशुधनासाठी संमिश्र वैरण खाद्याच्या विटा तयार करून उच्च पोषणयुक्त असलेला आहार निर्मिती करणे.<br>३. टंचाई काळात पशुधनासाठी स्वस्त दरात, सकस आहार उपलब्ध करणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| योजनेचे लाभार्थी | खाजगी संस्था/सार्वजनिक संघटन/उद्योग |
| लाभाचे स्वरूप | युनिट प्रस्थापित करण्यासाठी अनुदान |

| | |
|---|---|
| **योजनेचे नाव** | **(१६) पशुगणना १०० टक्के केंद्र पुरस्कृत** |
| योजनेचे स्वरूप | पशुगणना ही राज्यात सन १९५१ पासून सुरू करण्यात आली असून, सदरील योजना सन १९७८ पासून म्हणजे १२ व्या पशुगणनेच्या वेळी प्रथमच पशुसंवर्धन खात्याकडे सुपूर्द करण्यात आली. या योजनेअंतर्गत राज्यात पशुगणनेअंतर्गत आवश्यक बाबींवर खर्च करण्यात येतो. यामध्ये प्रगणकांचे मानधन, आवश्यक साधन सामुग्री खरेदी तसेच छपाई व प्रकाशनासाठी खर्च करण्यात येतो. १८ वी पशुगणना सन २००७ मध्ये करण्यात आली असून सन २०१२ मध्ये १९ वी पशुगणना करण्यात येईल. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |
| **योजनेचे नाव** | **(१७) एकात्मिक पाहणी योजना** |
| योजनेचे स्वरूप | राज्यात पशुसंवर्धनविषयक योजना आणि कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन करण्यासाठी उपलब्ध साधन सामग्री आणि उत्पादन क्षमते बाबतची आधारभूत आकडेवारी अद्ययावत उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच प्रमाणे पशुसंवर्धन विषयक राबविण्यात आलेल्या योजनांची दृष्य फलनिष्पत्ती जाणून घेण्याच्या दृष्टीने पशुधन उत्पादनाची अद्ययावत आकडेवारी गोळा करणे गरजेचे आहे. याच उद्देशाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आणि त्यांच्याकडून उपलब्ध होणाऱ्या अर्थ सहाय्यातून एकात्मिक पहाणी योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत वर्षातील ३ ऋतूमधील दूध, अंडी, लोकर व मांस यांच्या उत्पादनाची पाहणी करून सांख्यिकी आकडेवारी गोळा करणे, त्याचे पृथःकरण करणे, पशुजन्य उत्पादनाची आकडेवारी तयार करणे व एकत्रित माहिती प्रकाशित करणे इत्यादी कामे या योजनेअंतर्गत केली जातात. एकात्मिक पाहणी योजना ही योजना ५० टक्के केंद्र शासनाचे अनुदान व ५० टक्के राज्य शासनाचे योजनेत्तर अनुदान यानुसार खर्च करण्यात येतो. यामध्ये सदर योजनेअंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे आस्थापना यावर खर्च करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभ दिला जात नाही. |

| योजनेचे नाव | **(१८) पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम व बळकटीकरण करणे (केंद्र पुरस्कृत)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजना ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या प्रमाणात सन २०१०-११ पासून राबविण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरची योजना जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, तालुका लघुपशु-सर्वचिकित्सालय व पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ व श्रेणी-२ यांचे नवीन इमारत बांधकाम तसेच अस्तित्त्वातील इमारतींची दुरुस्ती करणे या बाबीवर खर्च करण्यात येतो. तसेच शेतकऱ्यांच्या जनावरांना अत्याधुनिक सेवा सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून या अंतर्गत हत्यारे, उपकरणे, साधनसामुग्री (फर्निचर) या बाबीवरही खर्च करण्यात येतो. बांधकाम या बाबीवर करण्यात येणारा खर्च हा प्रामुख्याने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडून अंदाजपत्रक घेऊन त्यांचेमार्फत करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे. |

| योजनेचे नाव | **(१९) पीपीआर रोगाचे नियंत्रण करणेसाठीचा राष्ट्रीय कार्यक्रम (१०० टक्के केंद्र पुरस्कृत)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ही योजना केंद्र शासनाने सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर केली असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अनुदानावर निधी उपलब्ध करून देण्यात येतो. पीपीआर हा शेळ्या/मेंढ्यांमध्ये आढळून येणारा विषाणूजन्य रोग असून, या रोगामुळे शेळ्या/मेंढ्यांमध्ये ताप येणे, डोळ्यातून व नाकातून पाणी गळणे, निमोनिया, डायरिया, गर्भपात यासारखी लक्षणे दिसून येतात. या रोगामुळे बाधीत शेळ्या/मेंढ्यांमध्ये ५०-८० टक्के मर्तुक होऊन पशुपालकांचे मोठ्याप्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे शेळ्या/मेंढ्यांचे पीपीआर या रोगापासून संरक्षण करून पशुपालकांचे होणारे आर्थिक नुकसान टाळणेसाठी केंद्र शासनाने ही योजना सन २०१०-११ पासून राज्यात मंजूर केली आहे. पीपीआर रोगप्रतिबंधक लसीकरणामुळे शेळ्या/मेंढ्यांमध्ये तीन वर्षापर्यंत रोग प्रतिकारशक्ती टिकून राहते. या योजनेअंतर्गत १०० टक्के शेळ्या/मेंढ्यांना पीपीआर रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात येत असून, केंद्र शासनाकडून लसमात्रा खरेदी, व्हॅक्सीनेशन कॉस्ट, शीतसाखळी, सीरोमॉनीटरींग, माहिती व संपर्क मेळावे या बाबींसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. राज्यातील एकूण १.३२ कोटी शेळ्या-मेंढ्यांना या योजनेत पीपीआर प्रतिबंधक लसीकरण करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व पशुपालक |
| लाभाचे स्वरूप | सर्वच जिल्ह्यांतील शेळ्या-मेंढ्यांना लसीकरण (केवळ नाममात्र सेवाशुल्क रुपये १/- आकारून) |

| योजनेचे नाव | **(२०) पोल्ट्री इस्टेट स्थापना (केंद्र पुरस्कृत)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजना ७५ टक्के केंद्र हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा या प्रमाणात सन २०१०-११ पासून महाराष्ट्रातील विदर्भामध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याचे प्रस्तावित असून या योजनेस केंद्र शासनाची प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये राज्यात विदर्भ विभागात पोल्ट्री इस्टेटची स्थापना करणे लक्ष्यांकित आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी State level sanctioning and monitoring committee ची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये नाबार्ड बँकेचा समावेश आहे. यासाठी राज्य शासनामार्फत जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पोल्ट्री इस्टेटसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोईंचा विकास उदा. खाजगी व्यावसायिकांना नाबार्डच्या माध्यमातून ५० टक्के व्याजमुक्त कर्ज देवून ब्रॉयलर तसेच अंड्यांवरील कुक्कुट पक्षांची यूनिट स्थापन करणे, कुक्कुट उत्पादने-पणन विषयक सुविधांचा विकास करणे इ.चा अंतर्भाव आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात नाबार्ड बँकेमार्फत सार्वत्रिक सुविधेअंतर्गत इतर सेवांसाठी ५० टक्के व्याजमुक्त कर्ज, शेतकरी व बँकर्स यांचे प्रशिक्षणासाठी, प्रसिध्दीसाठी, सभेंसाठी निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. ही योजना अद्याप राज्यात राबविण्यात आलेली नाही. केंद्र शासनानेही निधी उपलब्ध करून दिलेला नाही. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | कुक्कुट पालकांना मांसल अथवा अंड्यावरील पक्ष्यांकरिता मूलभूत सुविधा पुरविणे. |

## ४. अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना)

| योजनेचे नाव | **(१) अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा (सन २०११-१२ पासून सुधारित प्रमाणकानुसार)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जातींच्या तसेच नवबौध्द लाभार्थीना दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेसाठी अनुदान देण्यात येते. प्रती लाभार्थी २ संकरित गायी किंवा २ म्हशींचा गट पुरविण्यात येतो. पहिल्या वर्षासाठी जनावरांचा विमा त्यांच्या किंमतीच्या २.२५ टक्के याप्रमाणात उतरविला जातो. दुधाळ जनावरांच्या संगोपना-साठी प्रत्येक लाभार्थीस प्रतिदिन रुपये १००/- अनुदानासह २ दिवस प्रशिक्षण दिले जाते. वाटप केलेल्या जनावरांना जंतनाशके, लाळखुरकूत लस व खनिज मिश्रणे देण्यात येतात. सदर योजनेसाठी ७५ टक्के शासकीय अनुदान देण्यात येते. २५ टक्के लाभार्थीचा हिस्सा हा लाभार्थीने स्वत: अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज घेवून नगदी स्वरूपात भरावयाचा आहे. ही योजना जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार राज्यात सर्व जिल्ह्यांत राबविण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जाती तसेच नवबौध्द लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | ७५ टक्के अनुदानावर दोन दुभत्या जनावरांचा पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(२) अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांच्या दुधाळ जनावरांना (भाकड काळात) खाद्य अनुदान देणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थीना शासकीय योजनेव्दारे पुरवठा केलेल्या जनावरांना किंवा लाभार्थीकडे असलेल्या स्वत:च्या दुधाळ जनावरांना भाकड कालावधीसाठी पशुखाद्य देण्यात येते. लागोपाठच्या २ वेतामध्ये भाकड कालावधीसाठी प्रत्येक म्हशीसाठी २२५ कि.ग्रॅ. पशुखाद्य व प्रत्येक गाईसाठी १५० कि. ग्रॅम पशुखाद्य १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येते. गाभण काळात शेवटच्या २ महिन्यांसाठी (प्रथम गाभण काळासाठी) प्रत्येक गाई/म्हशींना अतिरिक्त ९० कि.ग्रॅ. पशुखाद्य १०० टक्के अनुदानावर देण्यात येते. सदर पशुखाद्य खरेदी खात्याने दरकरार केलेल्या संस्थांकडून करण्यात येते. ही योजना जिल्हा परिषदस्तरावर राबविण्यात येते. पशुखाद्य वाहतुकीचा खर्च लाभार्थीनी करावयाचा असतो. जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार राज्यात सर्व जिल्ह्यांत ही योजना राबविली जाते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जाती तसेच नवबौध्द लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | १०० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(३) अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थीना वाटप झालेल्या दुधाळ जनावरांच्या जोपासनेसाठी आवश्यक पशुसंवर्धनविषयक प्रशिक्षण देण्याची ही योजना जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थीना दुधाळ जनावरांच्या जोपासनेसाठी प्रशिक्षण देण्यात येते. हा प्रशिक्षण वर्ग ३ दिवस कालावधीचा असतो. जनावरांच्या शासकीय तसेच खाजगी संस्थांच्या प्रक्षेत्रावर सदर प्रशिक्षणार्थीची राहण्याची व जेवण्याची सोय करून प्रत्यक्ष तांत्रिक कामाबाबत प्रक्षेत्रावरच प्रात्यक्षिक देण्यात येते. आवश्यकतेनुसार प्रगतशिल शेतकऱ्यांकडे सहल/बचतगटांना भेटी देवून त्यानुसार त्यांचेकडील जनावरांच्या जोपासनेबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात येते. लाभार्थीचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याचा पाठपुरावा करून हा व्यवसाय पुढे सुरू राहील याबाबतही मार्गदर्शन करण्यात येते. जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार त्या त्या जिल्ह्यांत ही योजना राबविली जाते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जातींचे तसेच नवबौध्द लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | मोफत २ दिवसांचे प्रशिक्षण (प्रशिक्षण भत्त्यासह) देणे. |

| योजनेचे नाव | **(४) अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना शेळी गटाचा पुरवठा (सन २०११-१२ पासून सुधारित प्रमाणकानुसार)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थींना शेळ्या गट वाटप ही योजना जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येते. अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थींना शेळी गट वाटपात प्रत्येक लाभार्थीस १० माद्या व १ नर, एका गटात याप्रमाणे ७५ टक्के अनुदान व २५ टक्के वित्तीय संस्थेचे कर्ज अथवा लाभार्थींचा नगदी हिस्सा, या प्रमाणात सदर योजना राबविण्यात येते. यामध्ये नाबार्डच्या सुधारित दरानुसार शेळ्या व बोकड, शेळ्यांना राहण्यासाठी शेड व साहित्य, गटाचा विमा व खाद्य प्रतिदिनी याप्रमाणे ६ महिने देण्यात येते. पैदाशीचा बोकड, उस्मानाबादी/संगमनेरी किंवा पैदाशीच्या शासन धोरणानुसार पुरवठा करावयाचा असतो. सदर व्यवसाय लाभार्थीने सलग ३ वर्षे करणे आवश्यक असते. जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार राज्यात सर्व जिल्ह्यांत ही योजना राबविली जाते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जाती तसेच नवबौध्द लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | ७५ टक्के अनुदानावर शेळी गटांचा पुरवठा |

| योजनेचे नाव | **(५) अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांच्या जनावरांना जंतनाशक औषधांचा पुरवठा करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | अनुसूचित जातीच्या पशुपालकांपैकी बहुतांश पशुपालक आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. जनावरांसाठी जंतनाशके बाजारातून खरेदी करणे त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचेकडील जनांवरात जंताचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. या जनावरांपासून जास्तीत जास्त उत्पादन मिळणेसाठी व या आर्थिकदृष्ट्या कमकुवत पशुपालकांना आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध होण्यासाठी त्यांच्या जनावरांना जंतनाशकांचा पुरवठा करणे आवश्यक आहे. याकरिता सदर योजनेअंतर्गत पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांच्या जनावरांना जंतनाशक औषधांचा पुरवठा करणेत येतो. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जाती तसेच नवबौध्द लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | जंतनाशक औषधांचा पुरवठा पशुवैद्यकीय संस्थांद्वारे संबंधित लाभार्थ्यांना त्यांचे पशुधनासाठी मोफत करण्यात येतो |

## ५. बिगर आदिवासी सर्वसाधारण योजना – जिल्हास्तरीय योजना

| योजनेचे नाव | **(१) पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकीकरण.** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजना सन २०१०-११ पासून सुधारित स्वरुपात राज्यात राबविण्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाली असून याअंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात येतात.<br>१. पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकामः याअंतर्गत राज्यात जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत तसेच राज्यक्षेत्राअंतर्गत कार्यरत पशुवैद्यकीय दवाखाने, जिल्हा पशुवैद्यकीय सव 'चिकित्सालये, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये, जिल्हा कृत्रीम रेतन केंद्रे तसेच विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा इत्यादी पशुवैद्यक संस्थांचे बांधकाम करण्यात येते. (सार्वजनिक बांधकाम विभाग / जिल्हा परिषद बांधकाम विभागाद्वारे)<br>२. पशुवैद्यकीय संस्थांची स्थापना, आधुनिकीकरण व बळकटीकरण सदर कार्यक्रमाअंतर्गत विविध पशुवैद्यकीय संस्थांना आवश्यक असणारे साहित्य, उपकरणे, यंत्रसामुग्री, उपकरणे, डायग्नोस्टिक किट्स, स्टेन्स, केमिकल्स, रिएजंट, औषधे, द्रवनत्र, द्रवनत्र वाहतूक, बदली वाहन यासाठी निधी खर्च करण्यात येतो. तसेच नवीन पशुवैद्यकीय दवाखाने, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये, जिल्हा कृत्रीम रेतन केंद्रे स्थापन करणे तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चा दर्जावाढ करणे यासाठी आवश्यक वेतनेत्तर बाबींवर खर्च करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नसून पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाची योजना आहे. |
| लाभाचे स्वरूप | पायाभूत सुविधांचा विस्तार व बळकटीकरण केले जाते. |

| | |
|---|---|
| **योजनेचे नाव** | **(२) विविध पशुवैद्यकीय संस्थांना औषधांचा पुरवठा करणे** |
| योजनेचे स्वरूप | सदर योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाली आहे. पशुवैद्यकीय संस्थांना दैनंदिन व नियमित पशुउपचारासाठी आवश्यक असणाऱ्या औषधांचे शिवाय सांसर्गिक रोगप्रादुर्भाव, विषबाधा, नैसर्गिक आपत्ती अशा घटनांमध्ये बाधित जनावरांवर उपचार करण्यासाठी अतिरिक्त औषधींची आवश्यकता असते. या योजनेअंतर्गत सदर संस्थांसाठी जीवरक्षक औषधांचे खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. यासाठी जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालयासाठी रुपये ५०,०००/-, तालुकास्तरीय लघुपशु-वैद्यकीय सर्व चिकीत्सालयासाठी रुपये २५,०००/-, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ व फिरता पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी प्रत्येकी रुपये १५,०००/- तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ साठी रुपये ७,५००/- च्या मर्यादेमध्ये निधी उपलब्ध करून देण्यात येतो. या निधीतून निर्धारित केलेली जीवरक्षक औषधे प्राधान्याने निर्माण केली जातात. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व पशुपालक |
| लाभाचे स्वरूप | जनावरांसाठी आवश्यक औषधे पुरवठा |

| | |
|---|---|
| **योजनेचे नाव** | **(३) पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम** |
| योजनेचे स्वरूप | पशुप्रदर्शनाद्वारे ग्रामीण भागातील पशुपालकांना/शेतकऱ्यांना पशुसंवर्धनाविषयी सर्वांगिण माहिती मिळावी व त्यायोगे त्यांना पशुसंवर्धनाबाबत आवड निर्माण होऊन शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून पशुपालनाकडे बघण्याची दृष्टी प्राप्त करून देणे व शास्त्रोक्त पशुपालनाचा प्रसार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजनेअंतर्गत प्रदर्शनात सहभागी व विजयी घोषित करण्यात आलेल्या पशुपक्ष्यांना बक्षीस वाटप, पशुपक्ष्यांना देण्यात येणारा चारा व पशुखाद्य, प्रदर्शन व प्रचाराकरिता साहित्य तयार करणे, प्रदर्शन स्थळी स्टॉल लावणे, पशुप्रदर्शनावरील अनुषंगिक खर्च, वासरांचा मेळावा/जंतनिर्मूलन/औषधोपचार/लसीकरण इ. वरील अनुषंगिक खर्च तसेच विस्तार कार्यक्रम या बाबींवर खर्च करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | माहिती व प्रचार / विस्तार कार्यक्रम आयोजन. |

| | |
|---|---|
| **योजनेचे नाव** | **(४) एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम** |
| योजनेचे स्वरूप | या योजनेअंतर्गत सर्व प्रवर्गातील शेतकरी व पशुपालक यांना गिरिराज, वनराज, कडकनाथ, आरआयआर या सुधारित कुक्कुट जातींच्या पक्ष्यांचा ५० टक्के अनुदानावर ८ ते १० आठवडे वयाच्या २५ माद्या व ३ नर याप्रमाणे तलंग गटाचा पुरवठा करण्यात येतो. तसेच एक दिवसिय सुधारित कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटप कार्यक्रमाअंतर्गत सर्व प्रवर्गातील शेतकरी व पशुपालक यांना ५० टक्के अनुदानावर १०० सुधारित कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गटांचा पुरवठा करण्यात येतो. जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार त्या त्या जिल्ह्यांत सदर योजना राबविण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व प्रवर्गातील शेतकरी व पशुपालक |
| लाभाचे स्वरूप | ५० टक्के अनुदानावर तलंगांचे गट पुरवठा व १०० कुक्कुट पिल्लांचा पुरवठा. |

| योजनेचे नाव | **(५) वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या योजनेअंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात येतात<br>१. शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटपः राज्यातील पशुपालकांकडे असलेल्या पशुधनाची उत्पादकता वाढविणेसाठी व जास्तीत जास्त दुग्ध उत्पादनासाठी पशुपालकाकडे असलेल्या पशुधनला पुरेशी हिरवी वैरण उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर वैरणीचे उत्पादन घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर वैरणीचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सदर योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर, रुपये ६००/- प्रती ०.१० हेक्टरच्या मर्यादेत ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, लुसर्न व इतर वैरण बियाणे तसेच नेपियर, यशवंत व जयवंत या सुधारित बहुवर्षीय गवत प्रजातींचे ठोंबे वाटप करणेत येतात. या प्रमाणकात रुपये २,००० प्रती ०.१० हेक्टर यानुसार वाढ होणे अपेक्षित आहे.<br>२. विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरित/देशी गोवंशीच्या कालवडी, सुधारित/देशी म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्यः सदर कार्यक्रमाअंतर्गत पशुखाद्याच्या स्वरूपात अल्पभूधारक, अत्यल्प भूधारकास व भूमिहीन शेतमजूरांस ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य देणे व पशुपालकांचे संकरित/ देशी कालवडी/सुधारित/देशी पारड्याचा विमा या बाबींचा अंतर्भाव करण्यात येत आहे. लाभार्थीकडील संकरित/देशी कालवडीचा तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ३२ महिन्यापर्यन्त व सुधारित/देशी पारडीला तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ते ४० महिन्यापर्यन्त पशुखाद्याच्या स्वरूपात ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरविण्यात येते. वरील दोन्ही योजना जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार त्या त्या जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | सर्व प्रवर्गातील शेतकरी व पशुपालक |
| लाभाचे स्वरूप | १०० टक्के व ५० टक्के अनुदानावर अनुक्रमे वैरण बियाणे पुरवठा व पशुखाद्य पुरवठा (संकरित कालवडी/ पारड्यांना) |

| योजनेचे नाव | **(६) कामधेनू दत्तक ग्राम योजना (सन २०१०-११ पासून नव्याने मंजूर योजना)** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यातील गायी व म्हशींचे दूध उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ व्हावी यासाठी कामधेनू दत्तक ग्राम योजना ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याचे शासनाने निश्चित केले आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेकडील तसेच राज्य क्षेत्रीय पशुवैद्यकीय संस्थांचे कार्यक्षेत्रातील प्रत्येकी एक गाव सदर पशुवैद्यकीय संस्थेद्वारे दत्तक घेण्यात येणार असून, सदर गावामध्ये योजनाबध्दरित्या पशुसंवर्धन विषयक कार्यमोहिमा हाती घेण्यात येणार आहे. सदर योजनेअंतर्गत विभागाचे सर्वच कार्य उदा. जंतनाशके पाजणे, गोचीड गोमाशा निर्मूलन, वंध्यत्व निवारण, लसीकरण शिबीरे इ. कामे निवडलेल्या दत्तक गावांमध्ये एकत्रितरित्या राबवावयाचे असल्याने त्याचा योग्य तो परिणाम दिसून आल्या-शिवाय राहणार नाही असे सदर योजना राबविण्यामागील मुख्य सुत्र आहे. सदर योजना राबविण्याकरिता दिनांकनिहाय कृती आराखडा सर्व संस्थांना देण्यात येणार आहे. योजनेचे दूध वाढीचे उद्दिष्ट लक्षात घेता योजना सुरू करतेवेळी शेतकऱ्यांकडील दुधाळ जनावरनिहाय दूध उत्पादनाची आकडेवारी घेण्यात येऊन योजनेचा सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर पुन्हा दूधवाढी सबंधी सर्व आकडेवारी घेण्यात येऊन नेमकी फलनिष्पत्ती काय झाली याचा आढावा घेण्यात येतो. जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार प्रति दत्तक ग्राम रुपये १.५२ लाख यानुसार योजना राबविण्यात येत आहे. |
| योजनेचे लाभार्थी | योजनेअंतर्गत निवडलेल्या गावातील सर्व पशुपालक |
| लाभाचे स्वरूप | जनावरांकरिता लागणारी औषधे, पशुवैद्यकीय सेवा, वंध्यत्व निवारण शिबीरे, प्रशिक्षण यांचा सार्वत्रिक स्तरावर लाभ देणे. |

## ६. आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना-- जिल्हास्तरीय योजना

**(जिल्हा नियोजन समित्यांनी मंजूर केलेल्या निधीनुसार संबंधित जिल्ह्यात अंमलबजावणी)**

| **योजनेचे नाव** | **(१) अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थींना दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेसाठी अनुदान देण्यात येते. प्रति लाभार्थी २ संकरित गायी किंवा २ म्हशींचा गट पुरविण्यात येतो. पहिल्या वर्षासाठी जनावरांचा त्यांच्या किंमतीच्या २.२५ टक्के या दरम्यान विमा उतरविला जातो. दुधाळ जनावरांच्या संगोपनासाठी प्रत्येक लाभार्थीस प्रतिदिन रु. १००/- अनुदानासह २ दिवस प्रशिक्षण दिले जाते. वाटप केलेल्या जनावरांना जंतनाशके, लाळखुरकूत लस व खनिज मिश्रणे देण्यात येतात. सदर योजनेसाठी ७५ टक्के शासकीय अनुदान देण्यात येते. २५ टक्के लाभार्थीचा हिस्सा हा लाभार्थीने स्वतः अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज घेवून नगदी स्वरूपात भरावयाचा असतो. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातींचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | अनुदानावर दुधाळ जनावरे पुरवठा. |

| **योजनेचे नाव** | **(२) अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांच्या दुधाळ जनावरांना (भाकड काळासाठी) खाद्य अनुदान** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या योजनेअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थींना शासकीय योजनेव्दारे पुरवठा केलेल्या जनावरांना किंवा लाभार्थींकडे असलेल्या स्वतःच्या दुधाळ जनावरांना भाकड कालावधीसाठी पशुखाद्य देण्यात येते. लागोपाठच्या २ वेतामध्ये भाकड कालावधीसाठी प्रत्येक म्हशीसाठी २२५ कि.ग्रॅ.पशुखाद्य व प्रत्येक गाईसाठी १५० कि. ग्रॅम पशुखाद्य १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येते. गाभण काळात शेवटच्या २ महिन्यांसाठी (प्रथम गाभण काळासाठी) प्रत्येक गाई/म्हशींना अतिरिक्त ९० कि.ग्रॅ. पशुखाद्य १०० टक्के अनुदानावर देण्यात येते. सदर पशुखाद्य खरेदी खात्याने दरकरार केलेल्या संस्थांकडून करण्यात येते. ही योजना जिल्हा परिषदस्तरावर राबविण्यात येते. पशुखाद्य वाहतुकीचा खर्च लाभार्थींनी करावयाचा असतो. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातींचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | १०० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(३) अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना शेळी गटाचा पुरवठा** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थींना शेळ्या गट वाटप ही योजना जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येते. अनुसूचित जमातींच्या लाभार्थींना शेळी गट वाटपात प्रत्येक लाभार्थीस १० माद्या व १ नर, एका गटात याप्रमाणे ७५ टक्के अनुदान व २५ टक्के वित्तीय संस्थेचे कर्ज अथवा लाभार्थीचा नगदी हिस्सा, या प्रमाणात सदर योजना राबविण्यात येते. यामध्ये नाबार्डच्या सुधारित दरानुसार शेळ्या व बोकड, शेळ्यांना राहण्यासाठी शेड व साहित्य, गटाचा विमा व खाद्य प्रतिदिनी याप्रमाणे ६ महिने देण्यात येते. पैदाशीचा बोकड, उस्मानाबादी/संगमनेरी किंवा पैदाशीच्या शासन धोरणानुसार पुरवठा करावयाचा असतो. सदर व्यवसाय लाभार्थीने सलग ३ वर्षे करणे आवश्यक असते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातीचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | ५० टक्के अनुदानावर शेळी गटाचा पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(४) शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थींना शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन ही योजना जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येते. अनुसूचित जमातींच्या पशुपालकांकडे असलेल्या पशुधनाची उत्पादकता वाढविणेसाठी व जास्तीत जास्त दुग्ध उत्पादनासाठी पशुपालकाकडे असलेल्या पशुधनाला पुरेशी हिरवी वैरण उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर वैरणीचे उत्पादन घेणे आवश्यक आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतावर वैरणीचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सदर योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर, रू. २५०/- च्या मर्यादेत ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, लुसर्न व इतर वैरण बियाणें तसेच नेपियर, यशवंत व जयवंत या सुधारित बहुवर्षीय गवत प्रजातींचे ठोंबे वाटप करणेत येतात. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातीचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | १०० टक्के अनुदानावर वैरण बियाणे पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(५) अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना तलंगाचे गटाचा पुरवठा** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीचे लाभार्थी यांना १०० टक्के अनुदानावर ८ ते १० आठवडे वयाच्या १० माद्या व १ नर याप्रमाणे तलंगा गटाचा पुरवठा करण्यात येतो. सदर योजनेअंतर्गत ४००/- रू च्या मर्यादेमध्ये सुधारित कुक्कुट पक्षांच्या गटांचा पुरवठा करण्यात येतो. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातीचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | १०० टक्के अनुदानावर तलंग गटाचा पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(६) अनुसूचित जमातीच्या लाभार्थींसाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर कार्यक्रमाअंतर्गत पशुखाद्याच्या स्वरूपात अल्पभूधारक, अत्यल्प भूधारकास ५० टक्के अनुदानावर व भूमिहीन शेतमजूरांस ६६.६६ टक्के अनुदानावर पशुखाद्य देणे व पशुपालकांचे संकरित/देशी कालवडी/सुधारित/देशी पारड्याचा विमा या बाबींचा अंतर्भाव करण्यात येतो. लाभार्थीकडील संकरित/देशी कालवडीचा तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ३२ महिन्यापर्यन्त व सुधारित/देशी पारडीला तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ते ४० महिन्या पर्यन्त पशुखाद्याच्या स्वरूपात अनुदानावर पशुखाद्य पुरविण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातीचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | ५० टक्के व ६६.६६ टक्के अनुदानावर खाद्य पुरवठा |

| **योजनेचे नाव** | **(७) पशुवैद्यकीय दवाखान्यांचे बांधकाम करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजनेअंतर्गत शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचे बांधकाम करणेत येते. ही योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |

| योजनेचे नाव | **(८) पशुवैद्यकीय संस्थांना औषधांचा पुरवठा करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | अनुसूचित जमातीच्या पशुपालकांपैकी बहुतांश पशुपालक आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. जनावरांसाठी औषधे बाजारातून खरेदी करणे त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचेकडील जनांवरांचे आरोग्य अबाधीत रहावे याकरिता सदर योजनेअंतर्गत शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी क्षेत्रात कार्यरत पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांच्या जनावरांना औषधांचा पुरवठा करणेत येतो. ही योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |

| योजनेचे नाव | **(९) वंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजनेअंतर्गत शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी क्षेत्रात कार्यरत पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांच्या जनावरांसाठी १०० टक्के अनुदानावर वंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | अनुसूचित जमातींचे लाभार्थी |
| लाभाचे स्वरूप | वंध्यत्व निवारण शिबीरांमध्ये जनावरांना औषधोपचार करणे. |

| योजनेचे नाव | **(१०) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयाचे बळकटीकरण करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी जिल्ह्यात कार्यरत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयाचे बळकटीकरण करणेसाठी सदर योजनेअंतर्गत विविध कार्यालयीन बाबींसाठी आवश्यक खर्च करण्यात येतो. यामध्ये कार्यालयासाठी आवश्यक संगणक, प्रिंटर, स्टेशनरी, इन्व्हर्टर, झेरॉक्स/फॅक्स संयंत्रांची खरेदी इत्यादी बाबींचा समावेश आहे. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |

| योजनेचे नाव | **(११) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाचे बळकटीकरण करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी जिल्ह्यात कार्यरत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाचे बळकटीकरण करणेसाठी सदर योजनेअंतर्गत विविध कार्यालयीन बाबींसाठी आवश्यक खर्च करण्यात येतो. यामध्ये कार्यालयासाठी आवश्यक संगणक, प्रिंटर, स्टेशनरी, इन्व्हर्टर, झेरॉक्स/फॅक्स संयंत्रांची खरेदी इत्यादी बाबींचा समावेश आहे. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |

| योजनेचे नाव | **(१२) तालुकास्तरावर लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाची स्थापना व बळकटीकरण करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी जिल्ह्यात कार्यरत तालुकास्तरावर लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाचे बळकटीकरण करणेसाठी सदर योजनेअंतर्गत विविध कार्यालयीन बाबींसाठी आवश्यक खर्च करण्यात येतो. यामध्ये तालुकास्तरावर लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयासाठी आवश्यक बांधकाम, औषधे, फर्नीचर, संगणक, प्रिंटर, स्टेशनरी, इन्व्हर्टर, झेरॉक्स/फॅक्स संयत्रांची खरेदी इत्यादी बाबींचा समावेश आहे. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | पायाभूत सुविधांचा विस्तार करणे. |

| योजनेचे नाव | **(१३) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी -१ ची स्थापना करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यातील पशुपालकाकडील मौल्यवान पशुधनाचे विविध आजारापासून तसेच सांसर्गिक रोगापासून संरक्षण करण्यासाठी त्यांना त्वरित पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने राज्यात शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ ची स्थापना करण्यात येते. त्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषदांकडून मध्यवर्ती सोईस्कर ठिकाणाची स्थाननिश्चिती करून, शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर नवीन पशुवैद्यकीय दवाखाना कार्यन्वित केला जातो. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | पायाभूत सुविधांचा विस्तार करणे. |

| योजनेचे नाव | **(१४) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चा दर्जावाढ करणे** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यात शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी जिल्ह्यात सध्या कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चा टप्याटप्याने दर्जावाढ करणेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जातो. दर्जावाढीनंतर सदर पशुवैद्यकीय दवाखान्यांचे ठिकाणी पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील पद निर्माण करून त्याठिकाणी पदवीधर पशुवैद्यकाची पद स्थापना करण्यात येते. |
| योजनेचे लाभार्थी | ही वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | पायाभूत सुविधांचे आवश्यक बळकटीकरण करणे. |

| योजनेचे नाव | **(१५) जिल्हा कृत्रीम रेतन केंद्राची स्थापना व बळकटीकरण करणे.** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | शासनाने अधिसूचित केलेल्या आदिवासी जिल्ह्यात कार्यरत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्राची स्थापना व बळकटीकरण करणेसाठी सदर योजनेअंतर्गत कृत्रिम रेतन केंद्रासाठी आवश्यक बाबींसाठी खर्च करण्यात येतो. यामध्ये जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रासाठी आवश्यक बांधकाम, द्रवनत्रपात्र, ए.आय. गन्स, शिथ खरेदी इत्यादी बाबींचा समावेश आहे. |
| योजनेचे लाभार्थी | वैयक्तिक लाभाची योजना नाही. |
| लाभाचे स्वरूप | पायाभूत सुविधांचा विस्तार करणे. |